वर्ष- १२ अंक- ०३ मुंबई, मंगळवार, ०२ डिसेंबर ते ०८ डिसेंबर २०२५ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

PG|2

पाककला मशरुम पराठा

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

3 सिनेमा, वेबसीरिजचे समाज मनावर होणारे घातक परिणाम

देशविरोधी, दहशतवादी घटकांच्या सहभागाची होणार चौकशी 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

श्वान खोदू लागले माती, अचानक तरुणीचा दिसला हात पुरलेला मृतदेह पोलिसांनी बाहेर काढला, घटनास्थळी बॅग, सिंदूर...



- साक्षीचे तरुणावर जीवापाड प्रेम
- बॅगेवर तरुणाचे नाव
- माती उकरताना मृतदेहाचा दिसला हात
- नेमकं प्रकरण काय?

मुंबई। उत्तर प्रदेशातील प्रयागराज जिल्ह्यात लखराव गावात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका तरुणाने त्याच्याच मैत्रिणीची हत्या केली. त्यानंतर त्याने तिचा मृतदेह एका बागेत पुरला. या घटनेची माहिती पोलिसांना समजताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि सर्व तपास करून घटनास्थळावरील काही वस्तू आपल्या ताब्यात घेतल्या. तेव्हा पोलिसांचे पथक श्वानांसह घटनास्थळी दाखल झाले होते. तेव्हा त्याच ठिकाणी मृतदेहाचा हात बाहेर दिसला आणि तो हात दुसरा तिसरा कोणाचा नसून हत्या करण्यात आलेल्या तरुणीचा होता. तिचं नाव साक्षी यादव (वय १७) असे आहे. तर आरोपीचे नाव हर्षवर्धन सिंह असून तो सैन्यदलात कार्यरत असल्याची माहिती समोर आली.

नेमकं प्रकरण काय?

दरम्यान, पोलिसांनी घटनास्थळावरून मृतदेह ताब्यात घेतला आणि नंतर शवविच्छेदनासाठी पाठवला. अशातच या मृतदेहाला काही दिवस उलटून गेले होते. तरुणीची १० नोव्हेंबर दिवशी हत्या झाली होती आणि मृतदेह जमिनीत पुरण्यात आला होता. त्याच ठिकाणी तरुणीची बॅग पडली होती. पोलिसांनी एक पथक तयार केलं आणि तपासातून खळबळजनक प्रकार उघडकीस आला. संबंधित प्रकरणात एका वृत्तमाध्यमानुसार, तरुणी साक्षीचा मृतदेह पोलिसांनी ताब्यात घेतला. घटनास्थळी तरुणीच्या काही वस्तू पडलेल्या होत्या. पोलिसांनी त्या वस्तू आपल्या ताब्यात घेतल्या. तेव्हा त्या बॅगेवर तरुणाचे नाव लिहिलेलं आढळून आलं. तेव्हाच पोलिसांना या प्रकरणात एक भलताच संशय आला. पोलिसांनी घटनास्थळावरील सर्वच सीसीटीव्ही तपासले असता, तरुणी साक्षी ही हर्षदच्या मोटारसायकलवर दिसली. त्यानंतर पोलिसांनी तपास केल्यानंतर आरोपी हर्षवर्धनला आपल्या ताब्यात घेतलं. दरम्यान, हर्षवर्धनचं नुकताच विवाह ठरला होता. पण त्याच्यावर साक्षीचे जीवापाड प्रेम होते. ते एकमेकांना आधीपासून ओळखत होते. त्यांची सोशल मीडियावर मैत्री अधिकच घट्ट झाली होती. त्यानंतर मैत्रीचे प्रेमात रुपांतर झाले. हर्षवर्धनचा विवाह ठरल्याने साक्षीने त्याला विवाह करण्यास विरोध केला, पण नंतर हर्षवर्धनने तिला भेटायला बोलावले आणि मोटारसायकलवर बसवून एका बागेत नेत तिची हत्या केली आणि नंतर तिचा मृतदेह पुरला. या घटनेनंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली, तेव्हा श्वान देखील आले होते.

तेव्हा त्यांनी माती उकरण्याचा प्रयत्न केला असता, मृत तरुणीचा हात दिसून आला होता. त्याच ठिकाणी अनेक वस्तू छिन्न विच्छिन्न पडलेल्या होत्या. त्या ठिकाणी तरुणीची बॅग देखील होती. त्या बॅगेत एक सिंदूर असल्याचे सांगण्यात येत होते.

इंजिनिअर पत्नीवर पतीने ३ मित्रांना करायला लावले अत्याचार

३ लग्न अन् एक गर्लफ्रेंड, बोपदेवच्या नराधमाचे धक्कादायक कारनामे समोर

पुण्यातील बोपदेव घाट सामूहिक अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी अख्तर शेख याचे धक्कादायक कारनामे पोलीस चौकशीत उघडकीस आले आहेत. अख्तर शेखनं आतापर्यंत ३ महिलांशी लग्न केल्याची माहिती उघडकीस आली आहे, यातील दोन महिला नागपुरातील तर एक उत्तर प्रदेशातील आहे. याशिवाय आणखी एका तरुणीशीही त्याचे संबंध असल्याचं चौकशीत समोर आलंय. गुन्हा करताना त्याने गांजा प्यायलेला असल्याची माहिती पोलिसांनी न्यायालयात दिली आहे. या प्रकरणी अख्तरला २३ तारखेपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

पिंपरी चिंचवड।

पुण्यात सॉफ्टवेअर इंजिनअर असलेल्या ३० वर्षीय विवाहितेवर पतीसह चौघांनी अत्याराच केल्याची खळबळजनक घटना घडलीय. धक्कादायक बाब म्हणजे सॉफ्टवेअर इंजिनिअर असलेल्या पतीने तिच्यावर अनैसर्गिक अत्याचार केले.

त्यानंतर आपल्याच मित्रांना तिच्यावर वेगवेगळ्या दिवशी लैंगिक अत्याचार करायला लावले. याशिवाय त्याचं शूटिंगही केलं. यानंतर पती तिला ब्लॅकमेल करत होता. याबाबत मिळालेली माहिती अशी की, सॉफ्टवेअर इंजिनिअर असलेल्या ३० वर्षीय महिलेनं पोलिसात तक्रार दिली आहे. या तक्रारीनुसार पतीने सप्टेंबर २०२३ ते एप्रिल २०२४ या कालावधीत मित्रांसोबत मिळून अत्याचार केल्याचं म्हटलं आहे. महिला आणि तिचा पतीसुद्धा सॉफ्टवेअर इंजिनिअर आहे. पतीने जबरदस्तीने तिच्याशी अनैसर्गिक संबंध ठेवले.

पतीने त्याच्या मित्रांना पत्नीसोबत संबंध ठेवायला सांगितले. वेगवेगळ्या दिवशी लैंगिक अत्याचार करत त्याचे शूटिंगही केले. या अत्याचाराचे व्हिडीओ तिला दाखवून ते व्हायरल करण्याची धमकी दिली. जेव्हा अनैसर्गिक संबंधाला तिने नकार दिला तेव्हा पतीने तिला शिवीगाळ केली. या प्रकरणी गुन्हा दाखल झाला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.



आधी फसवून दारू पाजली अन् अत्याचार

महिला होमगार्डवर ४ जणांकडून सामूहिक लैंगिक अत्याचार!

■मुंबई। प्रतिनिधी,

आजच्या काळात सुद्धा, महिलांवर लैंगिक अत्याचाराचं वाढतं प्रमाण पाहायला मिळतंय. कठोर सुरक्षाव्यवस्था असूनही बलात्काराच्या बऱ्याच घटना घडल्याच्या बातम्या समोर येत असतात. कर्नाटतच्या कोप्पल जिल्ह्यातील मदलूर गावातून अशीच एक घटना घडल्याचं वृत्त समोर आलं आहे. येथे, एका ३९ वर्षीय महिला होमगार्डसोबत नराधमांनी घृणास्पद कृत्य केल्याची माहिती आहे. पीडितेच्या ओळखीच्या एका पुरुषाने तिची फसवणूक करत तिला दारू पाजली आणि त्याच्यासह चार आरोपींनी मिळून तिच्यावर सामूहिक बलात्कार केला.

घटनेनंतर, पीडितेने कसंबसं पोलिसांच्या इमरजेन्सी रिस्पॉन्स सपोर्स सिस्टमला फोन केला. घटनेची माहिती मिळताच, पोलीस तातडीने घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी पीडितेला गंभीर अवस्थेत येलबुर्गाच्या सरकारी रुग्णालयात उपचारांसाठी नेलं. मात्र, पीडितेची प्रकृती आणखी खालावत गेली. त्यानंतर, सरकारी रुग्णालयातील डॉक्टरांनी तिला कोप्पलच्या डक्टर रुग्णालयात रेफर केलं. सध्या, पीडितेची प्रकृती गंभीर असल्याचं सांगितलं जात आहे.

रुग्णालयात आपल्या पत्नीला भेटायला गेलेल्या पतीच्या वेदना सुद्धा स्पष्टपणे दिसत होत्या. त्यावेळी, पती म्हणाला की "माज्या पत्नीसोबत खूपच वाईट घटना घडली आहे. खरं तर, माज्या पत्नीला अपघात झाल्याचं मला सांगण्यात आलं होतं." पोलिसांनी आता या प्रकरणातील चारही आरोपींना अटक केली असून त्यांना न्यायालयात हजर करण्यात आलं. तिथून त्यांना न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आलं आहे.

४ जणांनी केला सामूहिक बलात्कार

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला कुश्टगी शहरात तिच्या नातेवाईकांना भेटायला गेली होती. त्यानंतर, पीडितेच्या ओळखीची लक्ष्मण केंचप्पा करगुली नावाची व्यक्ती तिला बाईकवर बसवून एका निर्जन ठिकाणी घेऊन गेली. प्राथमिक तपासावरून, पीडिता आणि आरोपी एकमेकांना आधीपासून ओळखत असल्याचं समोर आलं. पीडितेने पोलिसांकडे तक्रार करताना सांगितलं की, आरोपी लक्ष्मणने तिला ज्यूस असल्याचं सांगून दारू पाजली आणि नंतर, चार जणांनी मिळून पीडितेवर बलात्कार केला.

महाराष्ट्रात खळबळ! ठाण्यात सुटकेस मध्ये सापडला महिलेचा मृतदेह

ठाणे। महाराष्ट्रात महिलावंरील अत्याचाराच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. अशातच महाराष्ट्रात खळबळ माजवणारी घटना घडवी आहे. ठाण्यात सुटकेस मध्ये महिलेचा मृतदेह सापडला आहे. हा मृतदेह कोणाचा आहे? या महिलेवर अत्याचार झाला आहे का? याचा पोलिस शोध घेत आहेत. ठाण्यातून खळबळजनक घटना समोर आली आहे. २५ वर्षीय तरुणीचा मृतदेह सुटकेस मध्ये सापडला आहे. ठाण्यातील शीळ डायघर परिसरात सुटकेस मध्ये महिलेचा मृतदेह सापडला आहे. महिलेची हत्या करुन या महिलेचा मृतदेह सुटकेस मध्ये कोंबून खाडीत टाकण्यात आला आहे. पलावा समोरील खाडीत सापडला हा २५ वर्षीय महिलेचा मृतदेह सापडला आहे. महिलेवर अत्याचार करुन तिथी हत्या करुन शरीराची व्हिलेवाट लावण्याच्या उद्देशाने महिलेचा मृतदेह सुटकेस मध्ये कोंबून खाडीत टाकल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. महिलेचा मृत्यू कशामुळे झाला, तिची ओळख काय आहे? याचा तपास सुरु आहे. सुटकेस इथे टाकली की खाडीच्या पाण्यात वाहून आली याचा पोलिस तपास करत आहेत.



तुमचे नाव मनी लॉन्ड्रींगमध्ये, गुन्हा दाखल करायचा नसेल तर पैसे द्या, ३० लाखांची फसवणूक

भाईंदर। इंटरनेटच्या जगात सायबर क्राईमच्या प्रकरणांमध्ये मोठी वाढ होत आहे. यात बर्याच जणांना लाखोंचा गंडा घातला जात आहे.अशीच एक घटना काशीमीरा पोलीस ठाणे हद्दीत घडली आहे. येथे राहणार्या ८३ वर्षाच्या ज्येष्ठ वयोवृध्द व्यक्तीकडे, क्राईम ब्यूरो कार्यालयातून बोलत असून तुमचे नाव मनी लॉंड्रींगमध्ये आले असून तुमच्यावर गुन्हा दाखल करायचा नसेल , तुम्हाला अटक करायची नसेल तर ३० लाख रुपए द्या अशी मागणी करण्यात आली. त्यानंतर या व्यक्तीला ३० लाखांचा गंडा घालण्यात आला. याप्रकरणी काशीमीरा पोलीस ठाण्यात अनोळखी व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

काशीमीरा येथे ८३ वर्षार्चे रजबअली इस्माइल साबूवाला हे राहतात. साबूवाला यांना १७ नोव्हेंबर रोजी दुपारी त्यांच्या मोबाईलवर अनोळखी मोबाईल वरून व्हॉट्सअपवर व्हिडीओ कॉल करण्यात आला. त्यांना समोरून क्राईम ब्युरो, कुलाबा, मुंबई येथून बोलत असल्याचे सांगण्यात आवे. त्यावेळी अनोळखी इसमाने फियार्दी यांना तुमचे मनी लाँड्रींगमध्ये नाव आले आहे. त्यामुळे तुमच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येईल. तसेच तुम्हाला अटक होवू शकते अशी भिती घालण्यात आली. गुन्हा दाखल होऊ द्यायचा नसेल आणि तुमची अटक टाळायची असेल तर तुम्हाला पैसे द्यावे लागतील असे सांगण्यात आले. त्यावेळी अनोळखी व्यक्ती हा व्हिडीओ कॉलवर बोलत असताना त्याचा पूर्ण चेहरा न दाखवता तो अर्धवट दाखवून अधिक वेळ क्राईम ब्युरो ऑफीस दाखवत होता. त्यामुळे तक्रारदार यांनी भितीपोटी व्हिडीओ कॉलवर बोलर्णाया अनोळखी व्यक्तीने सांगितल्याप्रमाणे फिर्यादीच्या नावे बँक मधील असलेल्या एफ.डी. मोडल्या आणि त्या इसमाने सांगितलेल्या बँक खात्यावर ३० लाख रुपये आरटीजीएसद्वारे पाठविले.

अनोळखी व्यक्तीने फियार्दी यांना खोटे सांगत धमकी देवून त्यांच्याकडून १७ ते २० नोव्हेंबर या कालावधीत ३० लाख रुपये घेवून फसवणूक केली आहे या गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक दिलीप राख हे करत आहेत.



"जावयाने मुलीचं नाकच कापून टाकलं..." सासूने गंभीर आरोप करत पोलिसात केली तक्रार!

मुंबई। उत्तर प्रदेशातील अमेठी जिल्ह्यात पती आणि पत्नीमधील कौटुंबिक वादातून भयानक घटना घडल्याची बातमी समोर आली आहे. या वादात तरुणाने आधी पत्नीला लाथा-बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. इतकेच नव्हे तर, मारहाणीत पतीने त्याच्या पत्नीचं नाक कापून टाकल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेत गंभीररित्या जखमी झालेल्या महिलेला तातडीने रुग्णालयात नेण्यात आलं. सध्या, पीडितेची प्रकृती गंभीर असल्याची माहिती आहे.

संबंधित घटनेसंदर्भात महिलेच्या आईने पोलिसात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी तक्रारीच्या आधारे आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. आता, पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, राजेंद्र साहू नावाच्या तरुणाने सुनीता नावाच्या महिलेसोबत दहा वर्षांपूर्वी लग्न केलं होतं. या जोडप्याला तीन मुलं आहेत.

शिवीगाळ करत लाथा-बुक्क्यांनी मारहाण

प्रकरणातील पीडितेच्या आईने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी दुपारी जवळपास 4 वाजताच्या सुमारास राजेंद्र आणि सुनीतामध्ये काही कारणावरून मोठा वाद झाला. हा वाद इतका टोकाला पोहोचला की, राजेंद्रने रागाच्या भरात पीडितेसोबत भयानक कृत्य केलं. त्याने सुनीताला शिवीगाळ केली आणि निर्घृणपणे लाथा-बुक्क्यांनी तिला मारहाण केली. त्यानंतर त्याने घरात असलेल्या धारदार शस्त्राने सुनीतावर हल्ला केला आणि तिचं नाक कापून टाकल्याचा आरोप आहे. या गंभीर हल्ल्यानंतर पीडिता रक्तबंबाळ अवस्थेत खाली कोसळली.

घटनेचा आरडाओरडा ऐकून शेजारी राजेंद्रच्या घरी पोहोचले आणि सुनीताला तातडीने रुग्णालयात नेण्यात आलं. पीडितेच्या शरीरावरील गंभीर जखमा आणि अधिक रक्तस्त्राव लक्षात घेऊन डॉक्टरांनी तिला प्राथमिक उपचारानंतर गौरीगंज जिल्हा रुग्णालयात रेफर केलं. गौरीगंजहून तिला पुढील उपचारांसाठी रायबरेली येथील एम्स येथे पाठवण्यात आलं. सध्या तिच्यावर उपचार सुरू असून तिची प्रकृती गंभीर असल्याचं सांगितलं जात आहे.

दरम्यान, महिलेची आई पोलिसांना म्हणाली की, "साहेब! माज्या जावयाला पकडा. त्याने माज्या मुलीला मारहाण केली आणि तिचं नाक कापलं. त्याला शिक्षा व्हायलाच हवी. त्याच्यामुळे माझी मुलगी रुग्णालयात गंभीर अवस्थेत आहे."

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जखमी महिलेच्या आईने पोलिसात दिलेल्या तक्रारीवरून, आरोपी पती राजेंद्र साहूविरुद्ध गंभीर आरोपांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित घटनेपासून आरोपी फरार आहे आणि त्याला अटक करण्यासाठी पोलिसांचे पथक तयार करण्यात आले आहेत. लवकरच आरोपीला अटक केली जाणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

बापानेच मुलाच्या डोक्यात विट घालून दोघांना हाताशी धरत संपवलं

■मुंबई। प्रतिनिधी,

उत्तर प्रदेशातील बिजनौरमध्ये वडिलांनी दोन मित्रांच्या मदतीने आपल्याच लेकाची हत्या केली आहे. त्यानंतर वडिलांनी दोघांविरुद्ध मुलाच्या हत्येचा गुन्हा दाखल केला. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास केला असता, संशयाची सुई ही थेट वडिलांवर गेली. त्यानंतर वडिलांनी आपल्या गुन्ह्याचा कबुलीनामा दिला. हत्या करण्यात आलेल्या मुलाचं नाव सलमान असे होते. तर हत्या करणाऱ्या वडिलांचे नाव नफीस, तर इतर दोघांचे नाव शामशाद आणि महावीर असे आहे.

नेमकं प्रकरण काय?

या प्रकरणात नफीस, शामशादा आणि महावीर यांना अटक करण्यात आली आहे. हे प्रकरण बिजनौर जिल्ह्यातील स्योहार पोलीस ठाणे हद्दीतील बुधेरन गावातील आहे. ९ नोव्हेंबर रोजी एका आंब्याच्या बागेत प्लास्टिकच्या पिशवीत पॅक केलेला सलमानचा मृतदेह आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

पोलिसांनी तपास सुरु केल्यानंतर सलमानवर पॉक्सोअंतर्गत गुन्हा दाखल करत अटक करण्यात आली. काही दिवसांपूर्वी त्याची सुटका झाली होती. त्यांच्याविरुद्ध विनयभंग, बलात्कार आणि पोक्सो कायद्यांतर्गत इतर तीन खटले न्यायालयात सुरु होते. या प्रकरणात पोलिसांनी मोबाईल लोकेशन आणि पाळत ठेवत त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवले. त्यांनी कुटुंबातील सदस्यांची चौकशी केली असता, कुटुंबातील सदस्य दुःखी दिसत नव्हते.

पोलिसांनी घरातील महिलांची चौकशी केली असता, त्या सर्वांनी सलमानला चारित्र्यहिन असल्याचे सांगितलं. तसेच तो नेहमीच जबरदस्तीने लैंगिक संबंध ठेवण्याचा प्रयत्न करत असे. या प्रकरणात पोलिसांनी सलमानचे वडील नफीस यांची चौकशी केली असता, त्यांना रडू कोसळले.

त्यांनी पोलिसांना सांगितलं की, सलमानचा अशा वाईट वागण्याने आपल्याला आणि आपल्या कुटुंबाला त्रास सहन करावा लागला. तो नेहमीच बहिर्णीशी महिला नातेवाईकांशी शरीरसंबंध ठेवायचा. तो चारित्र्यहीन असून त्याने आपल्या बहिणीला देखील सोडलं नसल्याचं वडील नफीस यांनी सांगितलं.

वडिलांनी पुढे सांगितलं की, त्याचे मित्र शमशाद आणि महावीर यांना हाताशी धरत सलमानला मारहाण करण्याचा कट रचला. त्यानंतर, आम्ही तिघांनी त्याचा गळा दाबून खून केला आणि नंतर विटेनं हल्ला करत त्याची हत्या केली. नंतर तो मृतेदह प्लास्टिकच्या पिशवीत भरून अंब्याच्या बागेत फेकून दिला. या प्रकरणात पोलिसांनी सलमानवर हल्ला करत वीट जप्त केली आणि शमशाद आणि महावीर उर्फ पप्पूलाही ताब्यात घेत अटक केली.



पाककला




मशरूम पराठा

साहित्य :
गव्हाचे पीठ – १ कप, पाणी, मीठ चवीनुसार, मशरूम – १५० ग्रॅम, हिरव्या मिरच्या, कोथिंबीर,आले किसलेले, हळद – १/४ चमचा,लाल तिखट – १/२ चमचा, तेल किंवा तूप.

कृती- सर्वात आधी गव्हाच्या पिठामध्ये थोडे मीठ आणि पाणी घालून मऊ पीठ मळून घ्या. पीठ खूप घट्ट किंवा खूप सैल नसल्याची खात्री करा. यानंतर, पीठ झाकून ठेवा. आता, एका पॅनमध्ये थोडे तेल गरम करा, त्यात किसलेले आले आणि हिरव्या मिरच्या घाला आणि परतून घ्या. आता बारीक चिरलेले मशरूम घाला आणि मध्यम आचेवर ५ ते ७ मिनिटे शिजवा. मशरूममधील पाणी आटल्यावर, हळद, लाल तिखट आणि मीठ घालून चांगले मिसळा. शेवटी, कोथिंबीर घाला, गॅस बंद करा आणि थंड होऊ द्या. आता, मळलेल्या पिठाचे छोटे गोळे बनवा, एक गोळा लाटून घ्या, त्यावर मशरूमचे मिश्रण ठेवा आणि कडा घट्ट बंद करा. ते हलके लाटून घ्या जेणेकरून पराठा जास्त जाड होणार नाही. यानंतर, पॅन गरम करा आणि पराठा गरम तव्यावर ठेवा आणि दोन्ही बाजूंनी तपकिरी होईपर्यंत शिजवा. पराठा कुरकुरीत आणि चविष्ट होण्यासाठी थोडे तेल किंवा तूप लावा. तर चला तयार आहे स्वादिष्ट मशरूम पराठा रेसिपी.

काजूची उसळ



साहित्य:
काजू (भिजवलेले) – १ वाटी (रात्रीभर पाण्यात भिजवून घ्या), बटाटे (उकडलेले, चौकोनी काप) – २ मध्यम, हिरवी मिरची (बारीक चिरलेली) – २-३, कोकम (आगळ) – ४-५ (पाण्यात भिजवलेले), कांदा (बारीक चिरलेला) – १ मोठा, लसूण (ठेचलेला) – ५-६ पाकळ्या, हळद – १/२ चमचा, मालवणी मसाला (किंवा गरम मसाला) – १ चमचा, हिंग – चिमूटभर, मोहरी – १/२ चमचा, जिरे – १/२ चमचा, कढीपत्ता – ८-१० पाने, तेल – २ चमचे, मीठ – चवीनुसार, कोथिंबीर (सजावटीसाठी) – बारीक चिरलेली,

कृती: रात्रीभर भिजवलेले काजू पाण्यातून काढून ठेवा. (न भिजवले तर २ तास गरम पाण्यात भिजवा.) कढईत २ चमचे तेल गरम करा. मोहरी, जिरे, हिंग, कढीपत्ता घालून फोडणी द्या. ठेचलेला लसूण आणि हिरवी मिरची घालून ३० सेकंद परतून घ्या. बारीक चिरलेला कांदा घालून मध्यम आचेवर सोनेरी होईपर्यंत परतून घ्या (३-४ मिनिटे). हळद, मालवणी मसाला (किंवा गरम मसाला) आणि मीठ घालून १ मिनिट परतून घ्या. भिजवलेले कोकम (पाण्यासह) घाला. १ मिनिट शिजू द्या. उकडलेले बटाटे आणि भिजवलेले काजू घालून मिक्स करा. १/२ वाटी पाणी घालून झाकण ठेवून ५-७ मिनिटे मध्यम आचेवर शिजू द्या. काजू मऊ होतील आणि मसाला चांगला मुरेल. आच बंद करून वरून बारीक चिरलेली कोथिंबीर घाला. गरमागरम भाकरी, चपाती किंवा पोळीसोबत सर्व्ह करा!

मुलांच्या टिफिनसाठी १० मिनिटांत हेल्दी ब्रेकफास्ट!

साहित्य :
गव्हाचे पीठ- दोन कप, पाणी, मीठ चवीनुसार, तेल, ओवा- अर्धा चमचा, पनीर -एक कप किसलेले, मेथीची पाने – एक कप बारीक चिरलेली, हिरव्या मिरची- एक बारीक चिरलेली, लाल तिखट -अर्धा चमचा, आले किसलेले, धणे पावडर – अर्धा चमचा,

कृती :
सर्वात आधी एका भांड्यात पीठ घ्या. त्यात थोडे मीठ, ओवा आणि एक चमचा तेल घाला. बारीक चिरलेली मेथीची पाने घाला. पाणी घाला आणि पीठ मळून घ्या. पीठ झाकून ठेवा आणि १५ मिनिटे राहू द्या. आता भरणे तयार करा. यासाठी, एका भांड्यात किसलेले पनीर ठेवा. बारीक चिरलेल्या हिरव्या मिरच्या, किसलेले आले, धणे पावडर, लाल तिखट आणि मीठ घाला. आता पीठाचा गोळा तयार करा आणि तो लाटण्याने हलका रोल करा. मध्यभागी भरणे ठेवा, कडा बंद करा आणि गोल आकारात गुंडाळा. आता एक तवा गरम करा आणि त्यावर पराठा ठेवा. एक बाजू शिजल्यानंतर, तो उलटा करा आणि दुसरी बाजूही शिजवा. तेल घालून पराठा शेका. आता गरम पराठा प्लेटमध्ये काढून त्यावर बटर ठेवा. तयार पराठा चटणी किंवा दह्यासोबत नक्कीच मुलांच्या टिफिनसाठी द्या.


दलिया कटलेट

साहित्य :
दलिया- एक कप, उकडलेले बटाटे – दोन मध्यम, चिरलेले गाजर – १/४ कप, चिरलेले बीन्स – १/४ कप, मटार – १/४ कप, चिरलेला कांदा – एक, आले-लसूण पेस्ट – एक चमचा, हिरवी मिरची – एक, कोथिंबीर, मीठ चवीनुसार, लाल तिखट -अर्धा टीस्पून, गरम मसाला – अर्धा टीस्पून, लिंबाचा रस -एक टीस्पून, ब्रेडक्रंब -अर्धा कप, तेल.

कृती : सर्वात आधी एका पॅनमध्ये थोडे पाणी ठेवा आणि दलिया मऊ होईपर्यंत हलके उकळा आता गाळून घ्या आणि थंड होऊ द्या. जर तुम्हाला हवे असेल तर तुम्ही गाजर, बीन्स आणि वाटाणे वाफवून घेऊ शकता किंवा थोड्या तेलात तळू शकता. आता उकडलेले बटाटे एका मोठ्या भांड्यात मॅश करा. त्यात शिजवलेले दलिया, भाज्या, कांदे, आले-लसूण पेस्ट, हिरव्या मिरच्या, कोथिंबिर, मसाले, लिंबाचा रस आणि मीठ घाला. ब्रेडक्रंब घाला आणि सर्वकाही व्यवस्थित मळून घ्या. कटलेट्सना हाताने गोल आकार द्या. पॅनमध्ये तेल गरम करा आणि कटलेट्स मध्यम आचेवर सोनेरी तपकिरी होईपर्यंत तळा. किंवा, कमी तेलात शॅलो फ्राय करा. तर चला तयार आहे आपला हेल्दी आणि स्वादिष्ट नाश्ता दलिया कटलेट रेसिपी.



मेथी-पनीर पराठा



साहित्य:
२ गव्हाच्या चपाती, १ छोटा गाजर (किसलेला), १ छोटा काकडी (बारीक लांब काप), १ छोटा कांदा (बारीक काप), १ शिमला मिरची (बारीक पट्ट्या), थोडं कोबी (किसलेलं), १ चमचा दही, १ टीस्पून टोमॅटो सॉस, चवीनुसार मीठ, मिरी, थोडं बटर किंवा तेल.

कृती: पॅनवर थोडं बटर टाका आणि सर्व भाज्या थोड्या परतून घ्या (फक्त २ मिनिटं). त्यात मीठ आणि मिरी टाका. गॅस बंद करून थोडं थंड होऊ द्या. एका वाडग्यात भाज्या, दही आणि टोमॅटो सॉस एकत्र करा. हे मिश्रण चपातीवर पसरवा आणि घट्ट गुंडाळा. हव्यास असल्यास बाहेरून थोडं शेकून घ्या म्हणजे कुरकुरीत होईल.

सर्व्हिंग टिप:
कटरने दोन भाग करा, बाजूला हिरवी चटणी किंवा मिंट योगर्ट सॉस द्या. कॉफी किंवा ग्रीन टीसोबत एकदम परफेक्ट ट्रेंडिंग स्नॅक!

मखाना-ड्रायफ्रूट मिल्कशेक

साहित्य : एक कप मखाना, १/५ कप दूध, एक चमचा तूप, अर्धा कप मिक्स्ड ड्रायफ्रुट्स (काजू, बदाम, मनुका, पिस्ता), सहा खजूर, केशर, बर्फाचे तुकडे.

कृती :
सर्वात आधी एका पॅनमध्ये थोडे तूप गरम करा आणि मखाना हलका सोनेरी होईपर्यंत भाजून घ्या. आता मोठ्या भांड्यात घेऊन दूध आणि केशरमध्ये मखाने भिजवा. त्यांना सुमारे अर्धा तास बसू द्या जेणेकरून मखाना दूध पूर्णपणे शोषून घेईल. भिजवलेले मखाना दुधासह मिक्सर जारमध्ये ठेवा. सुकामेवा आणि बिया काढलेले खजूर घाला. आता ते बारीक बारीक करा. आता एका ग्लासमध्ये बर्फाचे तुकडे ठेवा आणि तयार शेक ग्लासमध्ये ओटा. आता मिक्स ड्रायफ्रुट्सने सजवा. तर चला तयार आहे, मखाना-ड्रायफ्रूट मिल्कशेक रेसिपी, उपवासाला नक्कीच बनवा.

कस्टर्ड ॲपल पुडिंग



साहित्य:
सीताफळ (कस्टर्ड ॲपल)-२ मोठे, दूध-५०० मिली, कस्टर्ड पावडर (व्हॅनिला)- २ टेबलस्पून, साखर-५-६ टेबलस्पून, ब्रेड-४ स्लाइस, कंडेन्स्ड मिल्क-२ टेबलस्पून, व्हॅनिला एसेंस-२-३ थेंब, चिरलेले काजू, बदाम, मनुके.

कृती : सर्वात आधी सीताफळ गर तयार करा. आता सीताफळ उघडा, बिया काढून फक्त मऊ गर घ्या. गर चांगला मॅश करा किंवा मिक्सरमध्ये २ सेकंद फिरवून घ्या. बाजूला ठेवा. आता १/४ कप थंड दुधात २ टेबलस्पून कस्टर्ड पावडर मिक्स करून घ्या. आता उरलेले दूध गरम करा, त्यात साखर घाला. दूध उकळी आल्यावर कस्टर्ड मिश्रण हळूहळू घालून सतत ढवळत राहा. २-३ मिनिटांत घट्ट होईल. गॅस बंद करा, व्हॅनिला एसेंस घाला. आता ब्रेड स्लाइसचे कडा काढा. सर्व्हिंग बाऊल/ग्लासमध्ये ब्रेडचे तुकडे ठेवा (१ लेयर). गरम कस्टर्ड थोडे थंड झाल्यावर त्यात सीताफळ गर घाला. चांगले मिक्स करा. तसेच कंडेन्स्ड मिल्क घातल्यास गोडवा वाढेल. आता ब्रेड लेयरवर सीताफळ कस्टर्ड ओता. वरती ड्रायफ्रूट्स, पुन्हा ब्रेड, पुन्हा कस्टर्ड असे लेयर्स करा. शेवटची लेयर कस्टर्डची ठेवा. आता फ्रिजमध्ये २-३ तास थंड करा. तसेच सर्व्ह करताना वर ड्रायफ्रूट्स किंवा सीताफळ गराने सजवा.

क्रंची व्हेज रोल



दाल मखनी



साहित्य :
एक कप- संपूर्ण उडदाची डाळ, १/४ कप- राजमा, २-३ टोमॅटो प्युरी, १/२ इंच- किसलेले आले, १/२ चमचा- हळद पावडर, १/२ चमचा- गरम मसाला, १/२ चमचा- लाल तिखट, दोन टेबलस्पून- क्रीम किंवा क्रीम, चवीनुसार मीठ, दोन टेबलस्पून- तूप किंवा बटर, कोथिंबीर.

कृती: सर्वात आधी मसूर आणि राजमा रात्रभर भिजवा.सकाळी, त्यांना प्रेशर कुकरमध्ये ४-५ शिट्ट्या येईपर्यंत वाफवा, जोपर्यंत ते पूर्णपणे मऊ होत नाहीत. आता एका पॅनमध्ये तूप गरम करा. किसलेले आले घाला आणि हलके तळा. टोमॅटो प्युरी घाला आणि तेल सुटेपर्यंत परतून घ्या. आता हळद, लाल तिखट, गरम मसाला आणि मीठ घाला आणि चांगले मिसळा. तसेच मसाल्यात उकडलेले डाळ आणि राजमा घाला आणि चांगले मिसळा व मंद आचेवर १०-१५ मिनिटे शिजवा. आता शेवटी, कोथिंबीरच्या पानांनी सजवा आणि गरम नक्कीच सर्व्ह करा.

संपादकीय

सिनेमा, वेबसीरिजचे समाज मनावर होणारे घातक परिणाम




संपादक दिपक मोरेश्वर नाईक

मुंबईने काही दिवसांपूर्वी एक सिनेमास्टाईल थरार अनुभवला. रोहित आर्य नावाच्या एका व्यक्तीने तब्बल १७ मुलांना ओलिस ठेवत आपल्या मागण्या सरकारपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला. पण, ही घटना समोर येताच तुमच्या डोक्यात एका सिनेमाचे नाव हमखास आले असेल ते म्हणजे काही वर्षांपूर्वीच डिस्नी प्लस हॉटस्टारवर आलेला प्रसिद्ध अभिनेत्री यामी गौतमचा अ थर्सडे. र्खया आयुष्यातील घटना सिनेमाच्या एका गोष्टीप्रमाणे वाटावी अशी ही पहिलीच वेळ नव्हे. जेव्हापासून सिनेमा हा लोकांच्या मनोरंजनापेक्षा सुड उगवण्याची प्रेरणा बनला आहे, तेव्हापासून अशा वृत्तीला आळा घालणं कठीण झालं आहे. काही सिनेमे आणि मालिका गुन्ह्यांना प्रवृत्त करतात.

सिनेमा हा समाजाचे प्रतिबिंब असल्याचे आपण आधीपासून ऐकत आलो आहोत. अशामध्ये अनेकदा सिनेमातील अनेक घटना या र्खया आयुष्यातील घटनेशी संबंधित किंवा प्रेरित असतात. गेल्या काही दशकांपासून अनेक अशा घटना समोर आल्या आहेत, ज्यामध्ये सत्य घटनेवर आधारित एक गोष्ट आपल्याला मोठ्या पडद्यावर दाखवली जाते. अर्थात, काहीतरी चांगले सकारात्मक विचार किंवा फारफार तर मनोरंजन करण्याचे काम या सिनेमांद्वारे केले जाते. पण, समाजावर पडणारा सिनेमाचा प्रभाव हा गेल्या अनेक दशकांपासून चिंतेचा विषय ठरला आहे. काही सिनेमा किंवा मालिका, या गुन्हेगारीला प्रवृत्त किंवा युक्ती देणाऱ्या ठरल्या आहेत. यामुळे लोकांची मानसिकता आणि काही सिनेमांचा पडणारा प्रभाव हा चर्चेचा विषय ठरला आहे. २०२३ या वर्षात 'द क्रिमिनोलॉजी परस्पेक्टिव्ह ऑफ क्राइम फिल्म्स' या अभ्यासात अभ्यासकांनी म्हटले होते की, त्यांनी केलेल्या सर्वेमध्ये ७० टक्के लोकांनी सिनेमा हा गुन्ह्यांना प्रेरित करतो असा दावा केला होता.

सिनेमांमध्ये दाखवल्या गेलेल्या गोष्टींचे अनुकरण करताना, अनेकदा काही गुन्हे घडल्याचे आपल्या ऐकिवात किंवा नजरेत आलेच असेल. याचे एक ताजे उदाहरण म्हणजे नुकतेच मुंबईतील रोहित आर्य प्रकरण. मुंबईतील गजबजलेल्या पवईसारख्या शहरात एक व्यक्ती आपल्या मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी १७ लहान मुलांना ओलिस ठेवतो. त्या मुलांना आपल्यासोबत काय होत आहे? याची साधी कल्पनाही नसते. पण, त्यांच्या खाद्यांवर बंदूक ठेवून तो प्रशासनाला आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी धमकावत असतो. ही एक गोष्ट ऐकल्यानंतर एखाद्या सिनेमाची गोष्ट असल्यासारखे वाटल्यावाचून राहत नाही. अशीच एक तंतोतंत योजना एका सिनेमात दाखवली आहे. एका घडलेल्या घटनेवरच तो सिनेमा बनवला असावा पण, असे नव्हे. अशीच एक घटना दाखवणारा सिनेमा, यामी गौतमची प्रमुख भूमिका असलेला, अ थर्सडे हा २०२२ या वर्षात ओटीटीवर प्रदर्शित झाला होता. पण आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे, रोहित आर्य प्रकरण हे २०२५ च्या ३१ ऑक्टोबर रोजी घडले.

उद्देश वेगळे असले तरी योजना सारखीच, आराखडाही जेमतेम सारखाच. यामी गौतमचे पात्रही शिक्षिकाच, रोहित आर्यही तसं बघायला गेले तर शिक्षकच होता, जो त्या उपस्थित मुलांना त्याच्या आगामी वेब सीरिजसारखे प्रशिक्षण देत असल्याचे त्या मुलांना भासवत होता. अशामध्ये यामी गौतमच्या पात्राप्रमाणेच त्याने मुलांच्या नावाने प्रशासनाला धमक्या देऊन आपल्या मागण्या पुढे ठेवू पाहिल्या. पण, तो तेव्हा हे विसरला की, सिनेमा आणि खऱ्या आयुष्यात मोठा फरक असतो. एकीकडे सिनेमात यामी गौतमच्या पात्राला न्याय मिळतो. पण दुसरीकडे र्खया आयुष्यात रोहित आर्यचा एन्काऊंटरमध्ये मृत्यू होतो. त्यानंतर असे म्हटले गेले की, रोहित आर्यने ही सर्व योजना सिनेमापासून आखल्याची चर्चा सुरू झाली. पण, यामध्ये किती तथ्य हे सांगता येणे कठीण. पण, यावेळी सध्याच्या घडीला पहिल्यांदाच लोकांना विचार करण्यास भाग पाडले की, होऊन गेलेला सिनेमा आणि घडलेली घटना यामध्ये एवढे साधर्म्य कसे? पण, सिनेमात घडलेल्या त्या घटनेचा विद्यार्थ्यांवर आणि पालकांवर नंतर काय परिणाम होतो? याची मात्र जाणीव खऱ्या आयुष्यात विचार केल्यावर भयावह चित्र समोर येते.



२०२२ मध्ये एका प्रकरणाने संपूर्ण देश हादरला होता. महाराष्ट्रातील पालघरमध्ये राहणारी श्रद्धा वालकर ही आपल्या लिव्ह-इन पार्टनरसोबत दिल्ली येथे राहत होती. ती बेपत्ता असल्याचे समोर आल्यानंतर वडिलांनी पोलिसांकडे तक्रार दिली आणि यातून जे समोर आले ती धक्कादायक होते. तपासातून समोर आले की, श्रद्धा वालकरची हत्या ही त्याचा प्रियकर आफताब अमीन पूनावालाने केली होती. यावेळी आफताबने तिची गळा दाबून हत्या केली. त्यानंतर तिची ओळख पटू नये म्हणून तिच्या शरीराचे तब्बल ३५ तुकडे केले. तिच्या शरीराचे ते तुकडे कुजून वास येऊ नये म्हणून त्याने फ्रीजमध्ये ठेवले. हा अपराध माणुसकीला लाजवेल असाच होता. पण, त्यानंतर त्याची चौकशी करताना हे कृत्य त्याने एका इंग्रजी वेब सीरिजने प्रेरित होऊन केल्याचे समोर आले.

सिनेमातील एखादा हिरो हा गुंड प्रवृत्तीचा, त्याची कामेही तशी कायद्याला धरून नसणारीच. पण, तरीही त्याला अशाप्रकारे सादर केले जाते की त्याची स्टाईल, त्याची चालण्याबोलण्याची वृत्ती रुबाबदार दर्शवली जाते. तो काही चुकीचे करत नसून त्याचे अनुकरण करायला हवे, अशी भावना तरुणांच्या मनात निर्माण होते. पुष्पा, केजीएफ हे त्याचे एक उत्तम उदाहरण आहे. पुष्पा हा सिनेमा प्रदर्शित झाला आणि त्याची स्टाईल आणि स्वॅग पाहून अनेकांनी तसे अनुकरण करत गुन्हा केल्याचे समोर आले. पुष्पा सिनेमा पाहून काही अल्पवयीन मुलांनी स्वतःला गँगस्टर म्हणवून घेण्यासाठी काही निष्पाप लोकांना जीवे मारले. तर, एकाने पुष्पा सिनेमात दाखवल्याप्रमाणे चंदनाची तस्करी करून पोलिसांना मूर्ख बनवण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले. एवढेच नव्हे तर, केजीएफ सिनेमा पाहून १९ वर्षीय शिवा प्रसादने स्वतःला प्रसिद्ध गँगस्टर बनविण्यासाठी तब्बल ५ लोकांचा जीव घेतला, ज्यामधील ४ सुरक्षा रक्षकांना झोपेतच मारले होते. यामुळे तो गँगस्टर तर नाहीच, पण सीरियल किलर बनला.

अनेक सिनेमांमध्ये प्रेमभंग आणि हिरोचा नकार न पचवणे, तसेच त्यासाठी वाट्टेल ते करणे हे ज्याप्रकारे दाखवले जाते. त्याचा समाजावर खासकरून मुलांवर कसा परिणाम होतो? याची तर अनेक उदाहरणे आहेत. सर्वात प्रसिद्ध म्हणजे २०१९ मधील उत्तर प्रदेशात झालेली हत्या. अश्विनी कश्यप उर्फ जॉनी दादा नावाच्या एका व्यक्तीने दुबईतील फ्लाईट अटेंडंट नीतिका शर्मा नावाच्या मुलीची हत्या केली. तिच्यावर तो प्रेम करत होता. पण तिचे दुर्सयाच सोबत लग्न होणार असल्याचे कळल्यानंतर कश्यपने तिची हत्या केली. गुन्ह्यानंतर त्याने शाहीद कपूरच्या कबीर सिंगमधील संवाद वापरत टिकटॉकवर एक व्हिडिओ पोस्ट केला. तसेच, दुसरीकडे २०१६ मध्ये स्नॅपडीलची आयटी इंजिनिअर दिप्ती सरना प्रकरणात आरोपीने १९९३ मध्ये आलेल्या शाहरुख खानच्या डर सिनेमातून प्रेरणा घेत अपहरण केले. अशी बरीच प्रकरणे देशाच्या कानाकोपऱ्यात पाहायला मिळतील, जिथे एकतर्फी प्रेमाचा उतारा काढण्यासाठी अनेकांनी सिनेमांच्या युक्त्यांचा सहारा घेतला आहे.

जेव्हापासून सिनेमा हा लोकांच्या मनोरंजनापेक्षा सूड उगवण्याची प्रेरणा बनला आहे, तेव्हापासून अशा वृत्तीला आळा घालणे खरंच कठीण झालं आहे. कारण, काही सिनेमे आणि मालिका अशा काही बनवल्या जातात ज्या अशा गुन्ह्यांना प्रवृत्त करण्याचे काम करतात. पूर्वी सिनेमा हा समाजाचा आरसा मानला जात होता. पण, सध्याच्या काळात सिनेमा हा फक्त पैसे कमावण्याचे साधन नसून काही जणांसाठी तो जीवनात थोड्या काळासाठी का होईना पण आनंद, मानसिक समाधान मिळवण्याचे एक सोपे साधन बनला आहे. यामध्ये सिनेमा बनवताना व्यावसयिक बाबी लक्षात घेता विचार आणि त्यातील कृतींचे परिणाम यावर सध्याच्या काळात खूप कमी लक्ष दिले जाते. अशामध्ये बहुतांश लोक हे सिनेमातील सकारात्मक गोष्टी आत्मसात करतात. तर काही नकारात्मक गोष्टी अंगी उतरून त्याचे अनुकरणही करतात. मग प्रश्न पडतो की, यावर उपाय काय? तर सिनेमा बघताना सर्व बाजू समजून काय चांगले, काय वाईट, कोणत्या कृतीचे परिणाम कसे होतील, यावर इतरांशी चर्चा करणे हा एक उपाय असू शकतो. मग ती आपली मुले असोत, पालक असोत, भावंडे असोत किंवा मित्रमंडळी. कारण, काळजी घेतली नाही तर पडद्यावरचे जग जेवढे रोमहर्षक वाटते, तेवढेच ते खऱ्या आयुष्यात एक भयानक चित्र बनून समोर येऊ शकते.

व्यवस्थेतील विरोधाभास



लोकशाही असलेल्या भारतात प्रतिदिन एकापेक्षा एक आश्चर्य वाटाव्यात, अशा विरोधाभासी घटना घडत असतात. त्यांतीलच २ घटना झ पहिली, कर्नाटकात दारूचे दुकान उभे करण्यासाठी मंदिर पाडण्यात आले आणि दुसरी म्हणजे हिमाचल प्रदेशात. तेथे १ वर्षाहून अधिक कालावधीपासून अनधिकृत मशीद पाडली जावी, यासाठी आंदोलने होत आहेत. बेंगळुरूतील होसकोटे तालुक्याच्या नंदगुडी गावात दारूचे दुकान बांधण्यात अडथळा ठरत असल्यामुळे मध्यरात्री जेसीबी आणून समाजकंटकांनी श्री आंजनेय स्वामींचे मंदिरच पाडले, तर सिमला येथील संजौली परिसरातील अनधिकृत मशिदीला टाळे ठोकण्याच्या मागणीसाठी 'देवभूमी संघर्ष समिती'ने २१ नोव्हेंबर या दिवशी पुन्हा एकदा आंदोलन करण्याचे ठरवले आहे. समाजाला सात्त्विकता देर्णाया मंदिरापेक्षा त्याला दारू उपलब्ध करून देऊन व्यसनाधीन बनवणे आणि आंदोलनानेच काय, तर न्यायालयाच्या आदेशानंतरही साधी वीटही हलणार नाही, या उद्दाम वृत्तीने गुन्हेगारांना आश्रय देणारी मशीद उभी असणे, या दोन्ही घटनांना कारणीभूत कोण आहे? या प्रश्नाचे उत्तर 'व्यवस्था' हे आहे. कर्नाटक आणि हिमाचल प्रदेश या दोन्ही राज्यांत सत्ता काँग्रेसचीच! काँग्रेस आणि अव्यवस्था हे समीकरणच! त्यामुळे ते बाजूलाच ठेवूया.

'दोन्ही घटनांकडे मंदिर आणि मशीद यांचा उल्लेख असल्याने धर्माच्या चष्म्यातून याकडे पाहिले जाते', असे म्हणर्णायांनी त्यांकडे 'वास्तू' म्हणून पहावे आणि दोन्ही घटनांचे पुनरावलोकन करावे. दारूचे दुकान उभे करण्यासाठी कुणाचीही कुठलीही वास्तू परस्पर, सरकारी अथवा प्रशासकीय अनुमतीविना पाडणे व्यवस्थेच्या दृष्टीने योग्य आहे का ? आणि न्यायालयाने आदेश देऊनही आणि वर्षभर आंदोलने होऊनही एखादी अनधिकृत इमारत अद्याप पाडली जात नाही, हे व्यवस्थेच्या दृष्टीने योग्य आहे का ? दोन्ही प्रश्नांचे उत्तर 'नाही' हेच आहे. 'अयोग्य आहे, तरी ते आहे', हाच व्यवस्थेतील विरोधाभास आहे. देशातील अनेक खेड्यापाड्यांतील प्राथमिक आरोग्य केंद्रांत, जिल्हा रुग्णालयांत डॉक्टर नाहीत; दुसरीकडे डॉक्टर झालेले मुसलमान जिहादी आतंकवादी असल्याचे पुढे येत आहे. अनेक शाळांमध्ये शिकवायला शिक्षक नाहीत, तर दुसरीकडे देशात बेरोजगार युवकांचे प्रमाण अधिक आहे. खासगी उद्योगक्षेत्रात मरेपर्यंत काम करण्याची पद्धत रूढ आहे, तर सरकारी कार्यालयातील कामांना निवांतपणाची बुरशी लागली आहे. काळानुसार लोक शिक्षित झाले; पण सुविचारी आणि सुसंस्कृत झाले नाहीत. देश सुरळीत चालू रहावा, यासाठी भारतात वेगवेगळ्या प्रकारच्या प्रशासकीय व्यवस्था कार्यरत आहेत; पण कुठल्याही व्यवस्थेत व्यवस्था राखण्यासाठी ना उद्देश आहे, ना व्यवस्थापन, ना कार्यवाही, ना नियंत्रण!

'एखादे काम योग्य प्रकारे वा पूर्ण होण्यासाठी केलेल्या आणखीला व्यवस्था म्हणतात', ही व्याख्या आताच्या काळानुसार 'एखादे काम न करण्यासाठी कोणतेही मार्ग अवलंबून ती केल्यासारखी दाखवणे', अशी झाली आहे. स्वातंत्र्याच्या ७८ वर्षानंतरही ढासळलेल्या व्यवस्थेची अनेक वृत्ते वृत्तपत्रांतून आणि आता सामाजिक माध्यमांतून झळकत आहेत. कुठे अनधिकृत फलक लागतात, कुठे अवैधपणे वाळूचा उपसा होतो, कुठे सरकारी भूमीवर अतिक्रमण होते, कुठे अनैतिक कृत्ये होतात. असे अपप्रकार देशभरात सर्वच ठिकाणी तेही मोठ्या प्रमाणात पहायला मिळतात. अनधिकृत फलक, अवैध परवाना, कायद्याचे उल्लंघन, गुन्हेगारी, घोटाळे, घुसखोरी अशा बातम्यांनी वृत्तपत्रांची पाने सदैव भरलेली असणे, हे व्यवस्था खालावल्याचे किंवा ती नसल्याचे दर्शक आहे. व्यवस्थेच्या आरंभी 'अ' लागला की, तीही 'अव्यवस्था'च होते आणि तीच टाळण्यासाठी व्यवस्थेने व्यवस्थितपणे कार्य करणे आवश्यक आहे. आतंकवादालाही कारणीभूत व्यवस्थाच आहे, हे म्हणण्याला वाव आहे. देहलीतील लाल किल्ल्याजवळ आतंकवाद्यांनी केलेल्या बाँबस्फोटाचे धागेदोरे अल-फलाह विद्यापिठात आढळले. वर्ष २०१४ पासून म्हणजे गेली १० वर्षे हे वैद्यकीय विद्यापीठ चालू आहे. तेथील अनेक डॉक्टर आतंकवादी आक्रमणाची चौकशी चालू झाल्यावर पसार झाले. या विद्यापिठाच्या प्रमुखाने कोट्यवधी रुपयांची मालमत्ता अवैधरित्या जमवली. तेथे जिहादी डॉक्टर हळूहळू आतंकवादाचे विष पसरवत होते आणि ते जिहादी केंद्र बनले होते, याचा मागमूस प्रशासनाच्या कोणत्याही व्यवस्थेला लागू नये, हे व्यवस्थेचे सर्वांत मोठे अपयश आहे. मुंबईतील २६/११ च्या आक्रमणाच्या वेळीही समुद्रकिनाऱ्यावर कार्यरत व्यवस्थेतील ढिसाळपणामुळेच आतंकवादी अगदी सहजगत्या मुंबईत घुसले आणि मोठी जीवितहानी करू शकले. गुजरातमधील सोमनाथ मंदिराच्या परिसरातील मोठ्या भूमीवर मुसलमानांनी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले, ते काही वर्षे तसेच होते. सरकारच्या अथवा मंदिरांच्या अनेक सरकारी भूमींवर मुसलमान अतिक्रमणे करून मशिदी, घरे बांधतात. घरे किंवा मशिदी उभ्या राहीपर्यंत ते न कळण्याला त्यांचा आकार काही काडेपेटीसारखा नसतो. ते लक्षात येऊ शकते; पण त्याकडे कुठलीही व्यवस्था तितकेसे लक्ष देत नाही. त्यासाठी व्यवस्थेतील प्रत्येक टप्प्यावर 'मलई' लाटली जाते. जोपर्यंत एखाद्या अपप्रकाराचे स्वरूप वाढून ते 'समस्या' म्हणून पुढे येत नाही, तोपर्यंत ढिसाळपणा चालू असतो. मग कुणीतरी त्याविरुद्ध तक्रार करतो. आणखी २-४ तक्रारी आल्यानंतर आणि कुणी आंदोलन वगैरे केल्यानंतर कारवाईसाठी 'अतिरिक्त' श्रम घेतले जातात. अतिक्रमण कशा प्रकारे होते? हे प्रशासनालाही ठाऊक आहे, तरीही याकडे मोठ्या प्रमाणात झालेले दुर्लक्ष व्यवस्थेच्या गळ्याशी केव्हाच पोचले आहे. भारताची आजची परिस्थिती सांगते की, समस्या ही केवळ एखाद्या मंदिराची किंवा अतिक्रमणाची नाही; समस्या ही प्रत्येक स्तरावर कुंथलेल्या व्यवस्थेची आहे. 'करावे एक आणि दाखवावे दुसरे' ही आजच्या व्यवस्थेची ओळख बनली आहे. शिक्षण, आरोग्य, कायदा-सुव्यवस्था, प्रशासन, विकास अशा प्रत्येक क्षेत्रात हा विरोधाभास जाणवतो. अतिक्रमण, गुन्हेगारी, भ्रष्टाचार, अकार्यक्षमता आणि ढिसाळपणा यांची साखळी पुष्कळ बळकट झाली आहे. प्रतिदिन नवी आश्चर्ये देणारी व्यवस्था देशाचा प्रवास अधोगती होण्याला पुरेशी आहे.

कायदे आहेत, आदेश आहेत, नियम आहेत; पण त्यांची कार्यवाही करणारी यंत्रणा जर निष्प्रभ असेल, तर समाजात अन्याय आणि विरोधाभास होणारच. त्यामुळेच प्रशासनाने, राजकीय नेतृत्वाने आणि समाजाने आपापले उत्तरदायित्व ओळखणे आवश्यक आहे. देश चालवणारी व्यवस्था दायित्व विसरली की, गुन्हेगारांचे धैर्य वाढते, तर सर्वसामान्यांचा विश्वास ढासळतो. म्हणूनच आवश्यकता आहे ती व्यवस्थेच्या मूळ ढाच्याला सक्षम करण्याची. 'अव्यवस्थे'तील या शब्दातील 'अ' काढून टाकण्यासाठी राष्ट्रहितासाठी कठोर, निष्पक्ष आणि सतत कार्यरत रहाणारी व्यवस्था उभी करणे आवश्यक आहे. राष्ट्रहितासाठी जागरूक व्यवस्था उभी राहिली, तरच हा विरोधाभास संपेल आणि भारतात सुराज्य येऊ शकेल!

पक्षांतर्गत संघर्ष आणि अस्वस्थ नेते

भाजपबरोबर दोन हात करत असतानाच, पक्षांतर्गत संघर्ष तीव्र झाला आहे. सध्याच्या घडीला एकनाथ शिंदे यांची शिवसेना अस्वस्थ झाली आहे. त्यामुळे हा सत्तासंघर्ष आगामी काळात कसे वळण घेतो हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

ज्या शिलेदारांना सोबत घेत एकनाथ शिंदे यांनी ठाकरेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र करत जबर धक्का दिला, तेच शिलेदार आता एकनाथ शिंदे यांच्यासाठी घातक ठरतायत की काय, अशी भीती राजकीय वतुर्ळात व्यक्त केली जात आहे. आधीच भाजपकडून एकनाथ शिंदे यांची कोंडी होत असतानाच आता विश्वासू शिलेदारच शिंदे यांच्या विरोधात बंड पुकारणार, अशी राजकीयदृष्ट्या अगदी नाजूक परिस्थिती शिवसेनेत निर्माण झाली आहे. भाजपबरोबर दोन हात करत असतानाच, त्यात पक्षांतर्गत संघर्ष वाढीस लागल्यामुळे सध्याच्या घडीला एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत अस्वस्थता निर्माण झाली आहे.

जून २०२२ मध्ये एकनाथ शिंदे यांनी शिवसेना बाळासाहेब उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला जय महाराष्ट्र केला आणि भाजपशी जवळीक साधली. ठाकरेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र करणे, भाजपशी हातमिळवणी करणे यामागे अनेक कारणे सांगितली जात आहेत. शिंदे यांनी उद्धव ठाकरेंना जबर धक्का दिला आणि देशातील राजकारणात शक्तिशाली भूकंप झाला. या भूकंपाचा केंद्रबिंदू अर्थातच महाराष्ट्र होता.

एकनाथ शिंदे यांचा सूरत-गुवाहाटी-गोवा असा राजकीय प्रवास सुरू झाला. या राजकीय प्रवासात उदय सामंत, दीपक केसरकर, शहाजी बापू, संजय शिरसाट, प्रताप सरनाईक असे दिग्गज नेते शिंदेंच्या सोबतीला होते. ठाकरेंच्या ४० नेत्यांना बरोबर घेत एकनाथ शिंदे यांनी नव्या राजकीय इनिंगला सुरुवात केली. स्वतःची शिवसेना स्थापन केली, पक्ष-चिन्ह या दोन्ही गोष्टी निवडणूक आयोगाने शिंदे सेनेला बहाल केले. संघर्ष करत एकनाथ शिंदे यांनी आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेत भाजपच्या मदतीने राज्यात सत्तापालट केला आणि मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे यांनी राज्याची सूत्रे हाती घेतली. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले हे त्यावेळचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पचनी पडले नसावे. त्यामुळे आडमागार्ने एकनाथ शिंदे यांची राजकीय कोंडी करण्याचा प्रयत्न झाला असावा. त्यातूनच एकनाथ शिंदे विरुद्ध फडणवीस असा वाद हळुवार समोर येऊ लागला. दुसरीकडे मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने शिंदेंच्या शिलेदारांनी खदखद व्यक्त करण्यास सुरुवात केली. एकीकडे भाजपकडून नाक दाबण्याचा प्रयत्न तर दुसरीकडे आपल्याच शिलेदारांची वाढती नाराजी, यामुळे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत अंतर्गत संघर्ष वाढत असून भविष्यात हा संघर्ष पेटणार अशी चिन्हे दिसू लागली आहेत. महायुती सरकारच्या स्थापनेनंतर एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना सत्तेचा गोडवा अनुभवत असली, तरी पक्षांतर्गत नाराजी आणि विरोधाची धार तीव्र होत चालली आहे.

एकनाथ शिंदे यांनी शिवसेना फोडून सत्ता हस्तगत केली, तेव्हा त्यांच्याकडे मोठ्या संख्येने आमदारांचा पाठिंबा होता. परंतु सत्ता टिकवण्यासाठी केलेल्या भाजपवरील अवलंबित्वामुळे शिवसेना शिंदे गटाची स्वतंत्र ओळख धूसर होत चालली का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. खरी शिवसेना म्हणून आपण समोर आलो, पण प्रत्यक्षात भाजपच्या धोरणांना अनुसरून चालण्याशिवाय आता शिंदे सेनेकडे पर्याय राहिलेला नाही. त्यामुळे शिवसेनेची मूळ शैली, लढाऊपणा आणि स्वबळावर राजकारण करण्याची प्रतिमा कमकुवत होत चालली आहे. एकीकडे पक्ष चिन्ह यावरचा सर्वोच्च न्यायालयाचा निकाल, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर शीतयुद्ध आणि पक्षातील नेत्यांची नाराजी यामुळे एकनाथ शिंदेंची चहुबाजूंनी नाकाबंदी झाली, असे राजकीय वतुर्ळात बोलले जात आहे.

मंत्रिपदे, संस्थांच्या नियुक्त्या, महत्त्वाच्या जबाबदाऱ्या यांमध्ये अनेक जणांना अपेक्षित स्थान न मिळाल्याने नाराजी वाढत आहे. त्यात स्थानिक पातळीवर भाजप आपली संघटना अधिक मजबूत करत आहे. अशा परिस्थितीत शिवसेना शिंदे गटातील आमदारांना स्वतःची जागा टिकवण्यासाठी भाजपकडे झुकावे लागत आहे. त्यात ठाकरेंच्या शिवसेनेशी सुरू असलेला संघर्ष, भाजपबरोबरील शीतयुद्धामुळे शिंदेंच्या शिवसेनेला सावध भूमिका घ्यावी लागत आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्यासाठी सध्याचे आव्हान म्हणजे अंतर्गत विरोध शमवणे, कार्यकर्त्यांशी संवाद, संघटनात्मक सुधारणा आणि स्वतंत्र ओळख मजबूत करणे हे आगामी काळात त्यांच्या नेतृत्वाची खरी परीक्षा ठरणार आहे. कारण सत्ता मिळवणे जितके कठीण तितकेच ती टिकवण्यासाठी पक्षातील ऐक्य आवश्यक आहे आणि तेच आज शिंदे यांच्या शिवसेनेत सर्वाधिक डळमळीत झालेले दिसून येते.

महाराष्ट्रातील सत्तेचा राजकीय पट सतत बदलत असताना महायुतीतील तीन प्रमुख घटक - एकनाथ शिंदे यांची शिवसेना, भारतीय जनता पक्ष आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस - यांच्यातील नातेसंबंध दिवसेंदिवस गुंतागुंतीचे होत आहेत. एकत्रितपणे सत्ता उपभोगत असताना सार्वजनिकरीत्या उमटणारे वाद, टोला-टिप्पण्या आणि परस्परांवरील नाराजी, विशेषतः शिवसेनेत वाढत चाललेली अस्वस्थता, हे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अत्यंत चिंताजनक आहे. भाजपच्या नेत्यांकडून झालेली प्रसंगी टीका, महत्त्वाच्या निर्णयांत शिवसेनेची मागे पडलेली भूमिका, तसेच मंत्रिमंडळात अपेक्षित तितकी प्रतिष्ठा न मिळाल्याच्या चर्चा, यामुळे शिवसेनेतील खासदार-आमदारांमध्ये अस्वस्थता वाढली आहे. ''सत्तेत आहोत, पण निर्णय कुठे आपल्या हातात आहेत?'' असा सूर आळवला जात आहे. महायुतीतल्या या अंतर्गत संघषार्ची सार्वजनिक झलक नुकत्याच झालेल्या सभांमध्येही दिसली, जिथे शिवसेना आणि भाजप नेत्यांत टोलेबाजी उफाळून आली. त्यात शिवसेनेचे अनेक नेते भाजपशी जवळीक साधून आहेत. त्यामुळे ठाकरेंच्या शिवसेनेला जय महाराष्ट्र करत स्वतःची शिवसेना स्थापन करणाऱ्या एकनाथ शिंदे यांना आता आपलेच शिलेदार नवी खेळी खेळतील आणि शिवसेना एकाकी पडेल, अशी भीती सतावणे स्वाभाविक आहे.

महायुतीतील तणाव लगेच वाढणार नाही, पण तो वाढत गेला तर आगामी निवडणुकीत त्याची मोठी राजकीय किंमत महायुतीला मोजावी लागू शकते. सत्तेची एकजूट टिकवण्यासाठी परस्परांतील मतभेद सोडवणे, निर्णय प्रक्रियेत पारदर्शकता ठेवणे आणि सर्व घटक पक्षांना समान प्रतिष्ठा देणे आवश्यक ठरणार आहे. त्यात जानेवारी २०२६ मध्ये पक्ष व चिन्ह याचा निकाल सर्वोच्च न्यायालय देणार आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल काय असेल हे गुलदस्त्यात असले तरी तुम्ही-आम्ही समजू शकतो. तरीही निकाल शिंदेंच्या शिवसेनेविरोधात गेला तर मात्र शिवसेनेला भाजपमध्ये विलीन होणे हाच पर्याय राहील. एकीकडे भाजपशी शीतयुद्ध, पक्षांतर्गत वादावादी आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाची टांगती तलवार यामुळे शिवसेना अस्वस्थ झाली आहे, हेही तितकेच खरे.

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

4

मुंबई, मंगळवार,०१ डिसेंबर ते ०७ डिसेंबर २०२५

राज्यात औषध संशोधन केंद्राची उभारणी

गुजरात, आंध्र प्रदेशच्या धर्तीवर सुविधा उभारण्याचा राज्य सरकारचा निर्णय

■मुंबई। प्रतिनिधी,

आरोग्य विज्ञानासाठी जैवतंत्रज्ञान महत्त्वपूर्ण ठरत असून औषध क्षेत्रातील अशा नावीन्यपूर्ण संशोधन आणि विकासासाठी (लाइफ सायन्सेस इनोव्हेशन अँड इन्क्युबेशन सेंटर) सुविधासंपन्न भव्य केंद्र उभारण्यासाठी कार्यवाही केली जाईल. गुजरात व आंध्र प्रदेशच्या धर्तीवर औषध संशोधन केंद्राची निर्मिती केली जाणार आहे. रोजगार निर्मिती, जागतिक दर्जाच्या औषधे उत्पादनांसाठी संशोधन केंद्राची गरज आहे. हे इनोव्हेशन पार्क निर्माण होणे हे काळाची गरज असून याच्या उभारणीतून महाराष्ट्र हा नावीन्यपूर्ण औषध निर्मिती क्षेत्रात आघाडीवर राहील, असे प्रतिपादन अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी केले.


मंत्री झिरवाळ यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक पार पडली. या बैठकीसाठी अन्न व औषध प्रशासन विभागातील सहआयुक्त (दक्षता) डॉ. राहुल खाडे, सहआयुक्त (औषधे) दा. रा. गहाणे, गिरीश हुकरे, व्ही. टी. जाधव आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ''औषध निर्मिती क्षेत्रातील कंपन्या यासाठी कामे करत असून त्यास मयार्दा आहेत. अशी संशोधन केंद्रे सुरू केली जात आहेत. गुजरात, आंध्र प्रदेश आणि हिमाचल प्रदेश या ठिकाणी असे संशोधन केंद्र उभे राहत असून औषधे गोळ्या, कॅप्सूल इत्यादींच्या विकासासाठी, जैविक व रासायनिक संशोधनासाठी फॉम्युर्लेशन लॅबचे सार्वजनिक-खासगी भागीदारीतून देखील उभारणी केली जात आहे. या दृष्टीने कार्यवाही करण्यात येणार आहे. या केंद्राचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे औषध, बायोटेक, मेडिकल उपकरणे, डायग्नोस्टिक्स आणि डिजिटल हेल्थ या क्षेत्रांतील नावीन्यपूर्ण स्टार्टअप्सना आधुनिक सुविधा, तांत्रिक मार्गदर्शन तसेच निधी उपलब्ध होईल. यातून राज्यातील औषधनिर्मिती उद्योगक्षेत्रात गुंतवणूक वाढ होईल. स्टार्टअप्सना मार्गदर्शन, प्रशिक्षण सुविधा, रोजगार निर्मिती, जागतिक दर्जाच्या औषधे उत्पादनांसाठी परिपूर्ण संशोधन संस्था म्हणून काम करेल,'' असे झिरवाळ यांनी सांगितले.



यावेळी या बैठकीत अन्नसुरक्षा अधिकारी, गुण नियंत्रण व दक्षता शाखेचे अधिकारी उपस्थित होते. हे इनोव्हेशन अँड इन्क्युबेशन सेंटर राज्यातील आरोग्य, औषधनिर्मिती व बायोटेक क्षेत्रातील नावीन्याचा जागतिक केंद्रबिंदू बनण्यास मोठी गती मिळेल. मार्गदर्शनाखाली हे केंद्र राज्याला स्पर्धात्मक लाभ मिळेल, नावीन्यपूर्ण उपक्रमांना चालना मिळणार आहे, असेही झिरवाळ यांनी सांगितले.

जानेवारीत अवघड, फेब्रुवारीत बोर्डाच्या परीक्षा

पालिका निवडणुका कोणत्या महिन्यात?



मुंबई। सर्वोच्च न्यायालयाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत घेण्याचे निर्देश दिले असले तरी त्यास मुदतवाढ मिळावी, यासाठी राज्य निवडणूक आयोगाच्या हालचाली सुरु आहेत. राज्यात फेब्रुवारीमध्ये बारावीच्या तर त्यानंतर दहावीच्या परीक्षांना सुरुवात होत असल्याने त्याआधी निवडणुका व्हाव्यात, यासाठी आयोग प्रयत्नशील असून, महापालिका निवडणुका कोणत्या महिन्यात होणार, याबाबत अंदाज वर्तवण्यात आला आहे. आशिया खंडातील सर्वात मोठी महापालिका अशी नावलौकिक असलेली बीएमसी निवडणूक कधी होणार, याकडे सर्वसामान्यांसह राजकीय वतुर्ळाचेही लक्ष लागून राहिले आहे.

निवडणुकीचा मार्ग मोकळा

ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नामुळे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडल्या. सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी दिलेल्या निदेर्शानुसार ५० टक्के आरक्षणमयार्देत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. परंतु, या सर्व न्यायालयीन प्रक्रियेत निवडणुकांचा कार्यक्रम दोन आठवडे मागे पडला आहे. त्यातच महापालिकांमध्ये मतदारयाद्यांचा कार्यक्रमही घोषित केला असून, २३ डिसेंबर रोजी प्रभागनिहाय अंतिम मतदारयादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्याआधी जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेणे गरजेचे असल्याने महापालिका निवडणुका किंचित लांबणीवर टाकावी लागण्याचे संकेत आहेत.

दहावी-बारावीच्या परीक्षांपूर्वी निवडणुकांचे संकेत

दुसरीकडे, राज्यात बारावीच्या परीक्षा १० फेब्रुवारीपासून सुरुवात होत असून, त्याआधी निवडणुका घेणे क्रमप्राप्त आहे. त्यानंतर दहावीच्याही परीक्षांना सुरुवात होणार असून, त्यानंतर निवडणुका घ्यायच्या असल्यास त्या थेट एप्रिल किंवा मेपर्यंत पुढे जाण्याचा धोका आहे. त्यामुळेच या सर्व परिस्थितीचा विचार करता निवडणुका घेण्यासाठी एक ते कमाल दोन आठवड्यांची मुदतवाढ मिळावी, यासाठी सर्वोच्च न्यायालयाला विनंती करण्याचा विचार आयोगाकडून करण्यात येत आहे. त्यानुसार महापालिका निवडणुका फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीस होण्याची दाट शक्यता आहे.

सुनावण्यांमुळे निवडणूक कार्यक्रमाला आधीच दोन आठवडे उशीर झाला असून, तो पूर्ण व्हावा, यासाठी सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली कालमयार्दा वाढवून मिळावी, अशी प्राथमिक चर्चा सुरू असल्याचे आयोगाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.

चप्पलचा पट्टा तुटण्याची छोटीशी गोष्ट

आधी बकार मागितला मग दोघांची मुंडकी कुऱ्हाडीने उडवली

मुंबई। एक अत्यंत धक्कादायक घटना घडली आहे. चप्पलच्या पट्ट्यावरुन सुरु झालेला छोटासा वाद इतका वाढला की, दोघांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. इतक्या छोट्याशा कारणावरुन झालेल्या दोन हत्यांमुळे परिसरात तणावाचं वातावरण आहे. या घटनेचं गांभीर्य लक्षात घेऊन विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली आहे. आरोपीला अटक करुन त्याची चौकशी सुरु आहे. ७२ वर्षीय सरगिया बालमुचू आणि त्यांची ६५ वर्षीय पत्नी मुक्ता बालमुचू या दोघांचा मृत्यू झाला. या जोडप्याचा ३१ वर्षीय मुलगा चरण बालमुचूने पोलिसात तक्रार दाखल केली. त्यानंतर तपासासाठी पोलिसांची विशेष टीम बनवण्यात आली. झारखंडच्या पश्चिमी सिंहभूम येथील गुआगु गावात ही धक्कादायक घटना घडली. पोलिसांनी सांगितलं की, सरगिया बालमुचू आणि त्यांची पत्नी मुक्ता बालमुचू यांची हत्या शेजारी राहणाऱ्या जंगम बालमुचूने केली. पोलिसांनी त्यांना अटक केली आहे. जंगमला त्याच्या चप्पलचा पट्टा तुटलेला दिसला. त्यावरुन तो संतापला. यासाठी त्याने बालमुचू जोडप्याच्या मुलींना जबाबदार धरलं. त्यावरुन दोन्ही कुटुंबांमध्ये वाद सुरु झाला. हळूहळू हा वाद तीव्र होत गेला. पोलिसांनी ही माहिती दिली. वाद सोडवण्यासाठी मागच्या रविवारी पंचायतीची बैठक बोलवण्यात आली. पण वादावर तोडगा निघण्याऐवजी अजून वाढला. बैठकी दरम्यान जंगमने पंचायतीसमोर एक बकरा आणि दारुची मागणी केली. जोडप्याने आपल्या आर्थिक परिस्थितीचा हवाला देत मागणी पूर्ण करण्यात असमर्थता दाखवली. त्यानंतर आरोपी नाराज होऊन बैठकीतून निघून गेला.



गेल्या ३ वर्षांतील स्फोटांची पोलीस करणार फेरतपासणी

देशविरोधी, दहशतवादी घटकांच्या सहभागाची होणार चौकशी



मुंबई। दिल्लीत झालेल्या कार स्फोटाच्या पार्श्वभूमीवर गेल्या तीन वर्षांत अपघाताने लागलेल्या आगीच्या घटना, स्फोट, रासायनिक आणि गॅस सिलिंडर स्फोटांची पुनर्तपासणी करण्याचा निर्णय महाराष्ट्र पोलिसांनी घेतला आहे.

या घटनांत अनेक जणांचा मृत्यू झाल्याने, त्या अपघात म्हणून दाखवलेल्या घटनांमध्ये कुठे देशविरोधी किंवा दहशतवादी घटकांचा सहभाग तर नव्हता ना, याचीही चौकशी केली जाणार आहे, अशी माहिती एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सोमवारी दिली. लाल किल्ल्याजवळ झालेल्या कार स्फोटात १५ जणांचा मृत्यू झाल्यानंतर खबरदारीचा उपाय म्हणून राज्यातील सर्व युनिट्सच्या प्रमुखांना म्हणजेच महानगरांचे पोलीस आयुक्त आणि जिल्ह्यांचे पोलीस अधीक्षक यांना या तपासाचे आदेश देण्यात आले आहेत.

गेल्या तीन वर्षांत अपघात समजून सोडून दिलेल्या आगीच्या घटना, स्फोट, रासायनिक आणि सिलिंडर स्फोटाच्या घटनांचा तपास पुन्हा सुरू करून त्यांचा सर्व बाजूंनी आढावा घ्यावा, असे निर्देश देण्यात आल्याचे अधिकाऱ्यांनी वृत्तसंस्थेला सांगितले.

काश्मिरींची तपासणी

महाराष्ट्रात राहणाऱ्या काश्मिरी विद्यार्थ्यांची तपासणी करून त्यांच्या यादीचे अद्ययावतीकरण करण्याचे कामही पोलिसांकडून करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. काश्मिरी विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी तपासणे आणि शैक्षणिक संस्थांशी नियमित संपर्क ठेवून अद्ययावत माहिती मिळवत राहणे, असे या निदेर्शात विशेषतः नमूद केले आहे.

वसई-विरार शहर महानगरपालिका

प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)

मुख्य कार्यालय विरार

दुरध्वनी क्र. १२२५० - २४०२१७९ / २४०२५६३

जावक क्र. :- व.वि.श.म./क.वि./१६४७/२५-२६

दिनांक :- २७/११/२०२५

जाहिर नोटीस

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६९ अन्वये जाहीर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अ. क्र.	विभाग	मालमत्ता क्र.	रिसीट नं	ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणा-या किंवा करदात्याचे नाव	खरिददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव
१	निळेमोरे-६	NL२९/२३४/२५	१५७३१	उल्हास आनंदजी रांभीया	विशाखा मनोहर तांबे / मनोहर दगडु तांबे
२	निळेमोरे-७	NL३०/३२३/२१	१५१२८	साक्षी समाधान मदिनकर	विकेश सी तांबे
३	निळेमोरे-७	NL३०/३७२/५३	१५६८१	संजय शिवप्पा पुजारी	पुनम आनंद चतुवेर्दी / आनंद तिर्थराज चतुवेर्दी
४	निळेमोरे-७	NL३०/३३०/२१	१५८४९	मनोज सावंत	शशीकांत नामदेव तांबे/ तेजाली शशीकांत तांबे
५	निळेमोरे-७	NL३०/४०९/३५	१४६७६	ओम दत्तगुरु डेव्ह.	सुजाता बाबुराव लाबड
६	निळेमोरे-७	NL३०/४०९/३९	१४६७५	ओम दत्तगुरु डेव्ह.	लडु सखाराम कांबळे / लतिका लडु कांबळे
७	निळेमोरे-७	NL३०/३१२/६	१४६१२	पुष्पाबाई पटेल	नाथुलाल जयचंद्र लोहार
८	निळेमोरे-७	NL३०/४०२/७३	१४६१३	गायत्री इंटरप्राईजेस	गौरी गणेश माधव
९	निळेमोरे-७	NL३०/३७७/२९१	१४५९७	नन्हेलाल म. विश्वकर्मा	चंन्दन सिंह व पिसा मंद सिंह कवर
१०	निळेमोरे-७	NL३०/३०७/३२	१४५०६	गणेश मधुकर करांडे	लता विगुल केसरकर
११	निळेमोरे-७	NL३०/३५०/६३	१५८९४	एस एस एटरप्राईज	अविनाश लक्ष्मण तळेकर
१२	निळेमोरे-७	NL३०/३५९/२८	१५७६६	राज कन्स्ट्र.	कुमार निरज झा / गुंजन निरज झा
१३	निळेमोरे-७	NL३०/२४३/२३	१५७५९	प्रमीला महादेव कासार	राकेश सत्यवान भुरटे / वंदिता राकेश भुरटे
१४	निळेमोरे-७	NL३०/३२५/१९	१५७६९	मनी सेल्वाराज	अमीत मोनोतोष संतरा / मोनोलिसा अमित संतरा
१५	निळेमोरे-७	NL३०/२९४/२९	१५७६०	दयाशंकर शर्मा	रमेशचंद्र दयाशंकर शर्मा
१६	निळेमोरे-७	NL३०/३०३/२१	१६२२५	मनोबोध रामनाथ चव्हाण	जयेश पुंडलिक भाटकर
१७	निळेमोरे-७	NL३०/२८१/९	२२०२	सुरेश लक्ष्मण चव्हाण	शेखर आमसे गोडवा
१८	निळेमोरे-७	NL३०/१८७/१६	२२०५	इदा भगा वाघ	सपना आशीष सिंह
१९	निळेमोरे-७	NL३०/४०५/७९	२५७४	अधिराज लक्ष्मी बिल्डर्स	राजकमल गौड / विमल गौड / गुंजन गौड
२०	निळेमोरे-७	NL३०/३८१/१५	१४६०६	संतोष बी कामठे	मोहम्मद यासीन अन्सारी

XXX

(अश्विनी मोरे)

सहायक आयुक्त

प्रभाग समिती (ई) नालासोपारा

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com